सत्र - 2019 - 20


CURRENT GLOBAL REVIEWER

| Special Issue 25 , Vol. 3<br>March 2020 | Peer Reviewed<br>SJIF | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

Impact Factor – 7.139 ISSN – 2348-7143


# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

March 2020 Special Issue- 25 Vol. 3

# The Current Issues in Social Sciences in India (CISSI-2020)


Chief Editor

Mr. Arun B. Godam

Guest Editor

Principal Dr. V.G. Sanap

I/c Principal Prof. Dr. B.D. Kokate

Editor

Dr. R.K. Kale

Co-Editor

Dr. S.N. Akulwar

Dr. B.D. Jadhavar

Dr. S.E. Ghumatkar



Shaurya Publication, Latur

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 25 , Vol. 3 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

SPECIAL ISSUE – 25 Vol 3

Title of the issue : - The Current Issues in Social Sciences in India (CISSI-2020)

© All rights reserved with the College & publisher Price : Rs. 400/-

**Chief Editor** – Arun Godam
Latur

**Guest Editor**
Principal Dr. V.G. Sanap
I/c Principal Prof. Dr. B.D. Kokate

**Editor**
Dr. R.K. Kale

**Co-Editor**
Dr. S.N. Akulwar
Dr. B.D. Jadhavar
Dr. S.E. Ghumatkar

**Published BY**
Shaurya Publication
Old MIDC , Near Kirti Gold Chowk, Latur
Email- hitechresearch11@gmail.com , 8149668999

**Printed By.**
**Shaurya Offset**
Old MIDC , Near Kirti Gold Chowk, Latur
Email- hitechresearch11@gmail.com

**EDITION :** **March 2020**

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 25 , Vol. 3<br>March 2020 | Peer Reviewed<br>SJIF | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

# Index

1. भारतीय सामाजिक आंदोलनों में महिलाओं की भूमिका — 1
करपे अश्विनी सहदेवराव , प्रोफेसर ललिता राठोड

2. नारी सशक्तिकरण और भारतीय नारियाँ — 3
प्रा. डॉ. गरगीळ गजानन बाबुराव

3. आंबेडकरी गीतातील सामाजिकता — 6
प्रा. डॉ. मनोहर सिरसाट

4. चलन निश्चलनीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्था — 9
डॉ.मारोती तेगमपुरे.

5. छत्रपती संभाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन- एक चिकित्सक अभ्यास — 13
प्रा.मोहन काळकुटे

6. भारतीय सामाजिक चळवळींमध्ये स्त्रियांचे योगदान — 15
मोहीनी ज्ञानेश्वर सुर्यवंशी

7. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे व उपाय योजना — 18
डॉ. मोहित बबन मुर्लीधर

8. आदर्श समाज निर्मितीसाठी तुकडोजी महाराज यांना अपेक्षीत महिला सक्षमीकरण — 22
शुभांगी विजयराज मोहोड

9. भारतातील दारिद्रयाचा अभ्यास — 24
डॉ. मुळे पी.एम.

10. कलम ३७० व ३५(A) चा भारतीय राजकारणावरील प्रभाव :- — 28
प्रा.मुंडे एस.एम.

11. धर्मनिरपेक्षता व राजकारण — 30
प्रा. डॉ. नागेश ख्रु. गायकवाड

12. भारतीय सामाजिक चळवळीत महिलांचे योगदान — 34
नागनाथ दाजिबा माळंगे

13. संयुक्त कुटुंबाच्या विघटनाची कारणे आणि परिणाम — 37
प्रा. डॉ. नवनाथ शिंदे

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 25 , Vol. 3 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# धर्मनिरपेक्षता व राजकारण

प्रा. डॉ. नागेश खु. गायकवाड

राज्यशास्त्र विभाग प्रमूख, एस. पी. एम. महा. चिखली जि. बुलडाणा

---

**प्रस्तावना :-**

धर्मनिरपेक्षता आणि राजकारण हे दोन शब्द वेगवेगळे आहेत धर्मनिरपेक्षतेची आवश्यकता जेव्हा धार्मिक वादाची निर्मिती झाली तेव्हापासून वाटू लागली आणि राजकारणाची सुरवात माणूस जेव्हा झाडावरुन खाली उतरुण टोळयांमध्ये राहु लागला तेव्हा पासुनच विविध गट, वर्चस्व आणि इतर अनेक गोष्टींपासून राजकारण हे त्यात आले. धर्म म्हणजे विचारप्रवाह होय. विविध विचारप्रवाहाचे विविध लोक जन्मास येतात. लोकांना धर्म हा वंशपरंपरागत मिळतो असे म्हणता येईल मानवाला त्याच्या तर्क बुध्दीने कोणता धर्म स्विकारावयाचा अथवा कोणती विचारसरणी स्विकारावयाची हे मानवावर अवलंबून आहे. उदा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ऐवला येथे धर्मांतराची घोषणा करुण 1956 साली नागपूर येथे बुध्द धर्माची दिक्षा घेतली धर्म आणि राजकारण यांचा सहसंबंध भरपूर प्रमाणात आढळतो. आपण धर्मनिरपेक्ष राजकारण असले तर काय होईल तसेच धर्मसापेक्ष राजकारण असले तर काय होईल याचा आढावा घेवू.

**धर्मनिरपेक्षतेची संकलपना व भारतीय संविधान**

भारतीय राज्यघटनेत सन 1976 साली 42 व्या घटनादुरुस्तीदवारे 'धर्मनिरपेक्ष' या शबदाचा समावेश करण्यात आला. भारतीय राज्यघटनेत धर्मनिरपेक्षतेची विधायक संकल्पना आहे म्हणजेच देशातील सर्व धर्मांना (त्याची संख्या कितीही असली तरी) राज्याकडून समान दर्जा व समान स्थान आहे. तुम्ही कोणत्याही धर्माचे असलात तरी तुम्हाला श्रध्दा व उपासनेचे स्वातंत्र असेल सर्व धर्मांना समान वागणूक देण्याव्यतीरीक्त राज्य काहीही करणार नाही. पण राज्य कोणत्याही धर्मावर आधारीत नसेल असे तद्रकालीन कायदेमंत्री H. R. Gokhale यांनी म्हटले होते. राज्याची कोणत्याही विशिष्ट धर्माशी निष्ठा नसेल तसेच ते अधार्मीक किंवा धर्मविरोधी नसेल सर्व धर्मांना समान स्वातंत्र असेल असे भारताचे माजी मुख्यन्यायमूर्ती P.B. Gajendragadkar यांनी म्हटलेले आहे. भारतीय राज्यघटनेत कलम 25 नुसार सदसदविवेक बुध्दीने वागण्याचे आणि धर्माचे पालण, आचरण, व प्रसार करण्याचे स्वातंत्र प्रदान केलेले आहे. त्याचप्रमाणे धार्मीक स्वातंत्रयाच्या हक्कामध्ये कलम 26, 27, 28 यांचा सुध्दा समावेश होतो.

**धर्मनिरपेक्षतेची व्याख्या**

स्वतःला धर्मनिरपेक्ष समजणारे लोक धर्मनिरपेक्षतेकडे अतिशय वेगळया दृष्टीने पाहतात. त्यांच्या मते, धर्मनिरपेक्षता ही अतिशय सकारात्मक तसेच क्रियाशिल वैश्विक गोष्ट आहे त्यामूळे ते धर्मनिरपेक्षता ही कोणत्याही धर्माच्या विरोधात असलेली बाब नाही, तर ते एक सुसंगत मुल्य आहे असं मानतात अर्थात विविध धर्माच्या परंपरांनी विविध धर्मनिरपेक्ष मूल्य स्विकारलेली आहेत. शहाणपणा आणि चांगुलपणा आपल्याकडेच आहे. असा दावा अनेक पंथ करतात तर असा कोणताही दावा न करणे हेच धर्मनिरपेक्ष लोकांच प्रमुख वैशिष्टे असते. नैतिकता आणि शहाणपण या गोष्टी कधीतरी एका दिवशी एखादया विशिष्ट वेळेला स्वर्गातून पृथ्वीवर आल्या आणि माणसाला मिळाल्या असं ते मानत नाहीत किंबहुना त्यांचा असा विश्वास आहे की नैतीकता आणि शहाणपण हा संपूर्ण मानवजातीचा नैसर्गिक वारसा आहे. म्हणूनच आपण अशी किमान अपेक्षा करायला हरकत नाही की, जगात काही मूल्य अशी असतील की जी पृथ्वीवरच्या संपूर्ण मानवसमाजाला स्विकार्य असतील मुस्लीम हिंदू तसेच अगदी नास्तीक लोकही ती मूल्य स्विकारतील

**राजकारण आणि भारत-** राजकारण ही आत्यंतीक महत्वाची अशी मानवी जिवनाशी निगडीत संकल्पना आहे. आपण अराजकीय असणं म्हणजे सभ्य असण असं कोणाच म्हणणं असेल तर माझ मत वेगळं आहे आणि पुर्णपणे उलट आहे अराजकीय

असणं म्हणजे असभ्यांना पाठींबा देणे होय. राजकारणात सर्वात प्राथमिकता मतदार म्हणून मानवाची भूमीका असायला हवी जर गांधी – नेहरूंनी, आंबेडकरांनी त्यापूर्वी टिळक, आगरकरांनी, गोखल्यांनी राजकारण केले नसते तर आपण दिमाखात वावरलो नसतो. आणि फक्त त्यांनीच नाही तर त्यांच्या सोबत असणा-या सर्वसामान्य मानसांनी राजकारण केले, राजकीय भूमीका घेतली इंग्रज जावेत एवढीच ती भूमीका नव्हती ते कोणत्या मार्गाने जावे आणि त्यानंतरचा देश कसा असावा ही राजकीय भूमीका इथल्या माणसांनी घेतली हा देश सर्वांचा असावा, तो धर्मनिरपेक्ष असावा, सर्वसामान्य मानसासाठी कल्याणकारी असे राज्य असावे, सरंजामदारांकडे एका मर्यादेच्या पलीकडे जमीन असता कामा नये ही सर्व त्यांची राजकीय भूमीका होती.

भारतात खूप राजकारण आहे असं आपण म्हणतो हे चूकीच नाहीच पण त्याहूनही खर हे आहे की राजकारणामूळेच भारत आहे. राजकारणामूळेच भारत आकारला आहे. सुनील खिलनानी म्हणतात INDIA DOES NOT NERELY HAVE POLITICS, BUT IT IS CONSTITUTED BY POLITICS भारताला आधुनिक जगाशी जोडले तेच मुळी राजकीय प्रक्रीयेन अमेरीकेमध्ये सर्वांना मताधिकार देण्यासाठी 1965 हे साल उजाडाव लागल आणि भारतात सरसकट सर्वांना 1950 साली मतदानाचा अधिकार देण्यात आला. याला कारण म्हणजे अन्य देशामध्ये स्वातंत्रचळवळ झाली आणि मग देशबांधणी झाली. भारतात स्वातंत्र्यचळवळीनेच देशाची बांधणी केली.

भारताला लोकशाहीचा अनुभव नाही, निरक्षरांचे प्रमाण प्रचंड आहे अशा स्थितीत सर्वांना मताधिकार हा जुगार आहे.अशी भिती व्यक्त केली जात होती. शिक्षणाची अट ठेवावी असा एक प्रस्ताव होता. शिक्षित लोक कोणत्या जातीचे-वर्गाचे आहेत ते स्पष्ट होते. त्यामूळे सर्वसामान्य मानसापासून मताधिकार हिरावून घेतल्या जाणार होता. अप्रत्यक्ष निवडणूक घ्यावी असाही एक प्रस्ताव होता मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले माझा इथल्या सर्वसामान्य मानसावर विश्वास आहे. तो शिकलेला नसेल त्याला लोकशाहीचा अनुभव नसेल मात्र तोच या राज्यघटनेचा आशय समजु शकतो त्याच्याच भरवशावर ही राज्यघटना सुरक्षित आहे. राज्यघटना कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ असे अवयव देईल परंतू त्यात प्राण फुंकतील ते आम्ही भारताचे लोक.

**धर्मसापेक्षता आधारीत राजकारणाचा मतितार्थ**

धर्म ही गोष्ट म्हणजे फक्त विचारप्रणाली नव्हे तर त्यासोबत मानवी भावना व मुल्य ही प्रत्यक्ष –अप्रत्यक्षपणे जोडलेली असतात. धर्मनिरपेक्ष असणे हे किती महत्त्वाचे आहे ही आपल्याला जागतीक परीस्थितीचा एकंदरीत आढावा घेतल्यानंतर कळते. ही धर्माधारीत असणा-या देशांची परिस्थिती ही आज रोजी काय आहे तेथे कश्याप्रकारे देवत्वाच्या नावावर राजकारण होते व मानवी जिवणाला उच्चाटन देणा-या बाबी या कश्याप्रकारे डावलल्या जातात हे तेथील विविध समस्या अर्थात, बेरोजगारी, कुपोषण, आरोग्यविषयक सोई सुविधा यांचा आढावा घेतल्यानंतर सहज लक्षात येते. भारतामध्ये आजरोजीही जवळ जवळ 5000 जाती अस्तीत्वात आहे. भारत हा वैवीध्यपूर्ण देश आहे. विविधतेमध्ये एकता याचा नामोल्लेख येथे प्रामुख्याने बघावयास मिळतो. आज रोजी भारतामध्ये विविध समस्या अस्तीत्वात आहेत.-भारतातील काही प्रमुख पक्ष या समस्यांकडे दुर्लक्ष करुन धर्माच्या नावावर राजकारण करताना व पूढील गंभीर समस्यांवर पांघरुन घालतात.

**1) बेरोजगारी –**

कर्मी मिळकती करीता बेकारी, अर्धबेकारी हे एक महत्त्वाचे कारण असते. बेकारांना आणि अर्धबेकारांना मिळकत खुपच कमी असते. आणि ज्यांना नोक-या आहेत त्यांचे पगारही समाजातल्या बेकारीमुळे मागणी पुरवठा या न्यायाने कमी होतात. आज रोजी भारतात गेल्या 45 वर्षातली सगळ्यात जास्त बेकारी असल्याचे निदर्शनास येते. 2011-12 मध्ये जी ती 2.2% होती ती जानेवारी 2019 मध्ये 6.1% झाली मार्च 2019 मध्ये प्रकाशीत झालेल्या Centre For Monitoring India Economy च्या रिपोर्टप्रमाणे तर फेब्रुवारी 2019 मध्ये बेकारी 7.2% इतकी जास्त झाली. एप्रिल 2019 च्या CMIF च्या आकडेवारीनुसार तर बेरोजगारी चक्क 8.1 % च्या वर गेली खेड्यात तर ती यापेक्षाही जास्त आहे. तरुणांमध्ये तर ती 16% आहे असे फेब्रुवारी

2019 मध्ये प्रकाशीत झालेल्या N.S.S.O. चा अधिकृत रिपोर्ट सांगतो. 2019 मध्ये भारतात काम करणारी माणसं एकूण लोकसंख्येच्या 39% होती आणि या बाबतीत 189 देशांत आपला 180 वा म्हणजे जवळपास सगळयात खालचा क्रमांक लागतो असं 2018 सालचा United Nations Human Development Report (UNHDR) सांगतो.

2) प्रदूषण –

याच काळात पर्यावरणाचा प्रश्न खुपच गंभीर होत चालला आहे. रोज कुठेतरी वादळ, पूर, दुष्काळ, त्सुनामी जंगलाला आग वैगरेंच्या बातम्या यायला लागल्या. ऋतूमध्ये बदलही आपल्याला जवळपास मोठया प्रमाणावर जाणवू लागतो भारतातल्या अनेक शहरांमध्ये मास्कशिवाय चालणे अशक्य झाले. World Health Organization ने Central Pollution Control बोर्डाची 2018 सालची आकडेवारी वापरुन काढलेल्या निष्कर्षाप्रमाणे जगातल्या सगळयात जास्त प्रदुषीत 15 शहरांमधील 14 शहरे भारतात होती. विद्यापीठातल्या एका रिपोर्ट प्रमाणे 180 देशातल्या Environmental Performance Index (EPI) मध्ये भारताचा नंबर 177 होता Environmental Health (पर्यावरणीय आरोग्य ) मध्ये शेवटचा म्हणजे 180 वा नंबर होता तर हवेच्या दर्जात (Air Quality) मध्ये 180 देशात 178 वा नंबर होता. एवढी महाभयंकर स्थिती सध्या अस्तित्वात आहे. आणि याबद्ददलची भणकही जनसामान्यांना नसते. या समस्यांवर पांघरुण घालण्यासाठी धर्मधारीत राजकारणाचा प्रयोग धर्मनिरपेक्ष राज्यात केला जातो.

धर्मनिरपेक्ष राजकारण कसे महत्वाचे:-

हल्लीच्या जिवणात राजकारण निवडणूका यांच्यामध्ये प्रचंड मोठया प्रमाणावर प्रसारमाध्यमे व समाजामध्ये यांचा उपयोग होतांना आपल्याला दिसून येतो. यांमध्ये प्रत्येक पक्ष आपण कसे मोठे आहोत याचे विकास मॉडेल मांडतो तसेच त्यांना भविष्यात कुठल्या गोष्टी करायच्यात जणतेने कोणते प्रश्न त्यांचे केंद्र आहे हे ते मांडण्याचे काम ते शिताफीने करीत असतात. परंतू भारतात 20 वर्षात जातीय राजकारण भरपूर मोठया प्रमाणात बघावयास मिळते. या राजकारणात मोठा जनसमुदाय निवडणूकीच्या शेवटच्या दिवशी उमेदवाराची जात बघतात तसेच पक्षसुध्दा विविध जाती जमातीचा विचारकरुनच निवडणूक लढवितांना दिसतात. आणि यासाठी विविध पक्ष हे मोठमोठे न्युज चॅनल्सच खरेदी करतात आणि आपल्या सोईनुसार बातम्या या जनतेपर्यंत पोहचविण्याचे काम त्या करीत असतात. त्यामूळे मुळ समस्येकडील लक्ष जावून जे मानवाच्या कल्याणासाठी आवश्यक नाही किंवा जातीय धार्मिक् तेढ निर्माण करण्या-या बातम्या पसरवितात जर धर्मनिरपेक्ष राजकारण असने तर मानव हा प्रत्येक गोष्टींकडे चौकस तसेच विज्ञान विवेक ठेवून बघतो यामूळे मानवाला जात-धर्म न दिसता करुणादृष्टी येवून माणूस दिसतो. धर्मनिरपेक्ष राजकारण असले तर माणूस हा आपल्याला कोणती समस्या आहे याला केंद्र माणून त्यादृष्टीने त्यावर उपाय शोधणारा नेता याची नेमणूक करुण देतो. भावनीक मुददे अर्थात धर्म, वंश, जात, लिंग यामध्ये भेद न करता. धर्मनिरपेक्ष लोक देवाची आज्ञा काय आहे असा प्रश्न विचारत नाहीत. किंबहूना या प्रश्नाची संबंधीत सर्व गटातटांच्या भावना ते काळजीपूर्वक जाणून घेतात, विविध प्रकारची निरीक्षण नोंदी, शक्यता ध्यानी घेवून कमीत कमी हानिकारक असा मध्यममार्ग कोणता असेल याचा शोध घेतात. धर्मनिरपेक्ष् लोकांना त्यांची संस्कृती किंवा देश, राष्ट्र एकमेव व्दितीय आहे असा अभिमान जरुर असतो. पण ते एकमेवव्दितीय असणं आणि सर्वश्रेष्ठ असणे यामध्ये गल्लत करत नाहीत. त्यामूळे धर्मनिरपेक्ष लोकांना राष्ट्राप्रती, देशाप्रती असलेल्या त्यांच्या विशेष कर्तव्याची जाणीव असते. पण त्यांना फक्त त्यांच्या देशाशी निगडीत कर्तव्येच पार पाडायची आहेत, असं ते मानत नाहीत संपूर्ण मानवजातीप्रती असलेल्या त्यांच्या कर्तव्याची जाणही त्यांना असते. विचार करण्याचं एखादया गोष्टीचा शोध घेण्याचं , प्रयोग करण्याच स्वातंत्र असल्याखेरीज आपण सत्याचा तसंच मानवी जगण्यातील वेदना कमी करण्याच्या मार्गाचा शोध घेवू शकत नाही म्हणून धर्मनिरपेक्ष लोक स्वातंत्र्याचा आग्रह धरतात सत्य काय आहे आणि योग्य काय हे ठरविण्याचा सर्वाधीकार ते कधी एका पुस्तकाला, संस्थेला वा नेत्याला देत नाही शंका घेण्याच पुन्हा पुन्हा शोध घेण्याच दुसर मत मागण्याच वेगळा मार्ग शोधण्याच स्वातंत्र्य माणसांनी नेहमी जतन केले पाहीजे धर्मनिरपेक्ष लोक विश्वाच्या मध्यभागी पृथ्वी अचल बसून आहे का? असा प्रश्न विचारण्याचं धाडस करणा-या गॅलिलीओ चे कौतूक करतात. गो-या

प्रवाशांसाठी बसमध्ये आरक्षित असलेल्या खुर्चिवर बसण्यास धैर्य दाखवणा-या रोझा पार्कचेही कौतूक करतात या उदाहरणांवरुन धर्मनिरपेक्ष असणे हे राजकारणाच्या दृष्टीने आत्यंतीक महत्वाचे आहे असे आपल्याला दिसून येते. धर्मनिरपेक्षता असेल तर धर्माच्या नावाने थाटलेली दुकाने उध्वस्त होतात.

बराक – हुसेन – ओबामा :- वंश धर्मनिरपेक्षतेचे आंत्यतीक महत्वाचे उदाहरण :-

2008 साली बराक ओबामा अमेरीकेचे राष्ट्राध्यक्ष आले. ओबामा अमेरीकेच्या अध्यक्षपदासाठी निवडनुकीला पहिल्यांदा उभे राहीले तेव्हा त्यांच्यासमोर उभे होते जॉन मॅकेन टिपीकल, अमेरीकन ओबामा हे कोणत्याच अर्थाने टिपीकल नव्हते ओबामा निवडून आले त्यांनी शब्दश: इतिहास घडविला आजवर ज्या अमेरीकन टिपीकल गोरे, ख्रिश्चन अध्यक्ष आले तिथे काळ्या बापाचा – गो-या आईचा हा बहुसांस्कृतीक वारसा लाभलेला पोरगा अध्यक्ष झाला कुमारी मातेचा हा मुलगा याच्या जन्मानंतर त्यांनी लग्न केले अगदी प्रतिकुल परिस्थीतीमध्ये लहानचा मोठा झालेला बराक ओबामा नावाचा नेता अमेरीकेच्या अध्यक्षपदासाठी रिंगणात उभा राहणे, हीच क्रांती होती ते जिंकले अमेरीकेचे अध्यक्षही झाले 'मी पहिला ब्लॅक प्रेसिडेंट नाही फक्त पहिला ब्लॅकबेरी प्रेसिडेंट सुध्दा आहे. असं ओबामांनी सांगतले होते ही क्रांती अमेरीकेत घडली त्यामागे [illegible]थील लोकांची जागृकता ही फार महत्वाची ठरली. धर्मनिरपेक्षता हे मुल्य तेथे अंगीकारलेले दिसते. ब्लॅक

निष्कर्ष :-

धर्मनिरपेक्षता व राजकारण यांचा सहसंबंध जर असला तर आपल्या राजकारणात पवित्र्य तसेच भेदविरहीत समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी हे आंत्यंतीक महत्वाचे आहे असे आपल्याला जाणून येईल आजरोजी समाजात प्रचंड मोठ्या प्रमाणात चंगळवाद, विषमता, प्रदुषण, आरोग्यविषयक समस्या, हवामान ह्या समस्या निर्माण झालेल्या आहेत. या मुदयावर आजरोजी निवडणूक लढवावी अश्या या समस्या आहेत. परंतू राजकारण्यांचे सर्व डाव फसले तर ते धर्माच्या मुददयावर बोलतात व एका मोठया जनसमुदायाला केंद्रीत करुण मतांचे राजकारण करतांना आपल्याला दिसतात. येथे आपली धर्मनिरपेक्ष बाजू असेल तर आपण समस्याकेंद्रीत होवून सत्य, असत्य यात फरक करतो. भावनीक मुददा जर असेल तर आपण त्याची तिव्रता किती व तिचे रुपांतर हे शारीरीक आजारांमध्ये किंवा व्देषामध्ये न होवू देता आपण योग्य ती कार्यवाही करुण नेहमी अग्रकर्मी बनत जातो. आज संपूर्ण जगताला धर्मनिरपेक्षता आधारीत राजकारणाची अत्यंत गरज आहे.

संदर्भ :-

1) M. Laxmikant (2009) Indian Polity Marathi Edition Page No. 64

2) Yuvol Noah Herati (2019) 21 Lessons For 21st Century Madhushri Publication Page No. 252/253

3) संजय आवटे (2018) आम्ही भारताचे लोक, माइंड अँड मिडीया प्रकाशन (नववी आवृत्ती) पृष्ठ क्र. 25

4) उपरोक्त -3 पृष्ठ क्र.25

5) अच्युत गोडबोले (2019) अनर्थ, मनोविकार प्रकाशन, पृष्ठ क्र. 81

6) उपरोक्त – 2 पृष्ठ क्र. 254

7) उपरोक्त – 2 पृष्ठ क्र. 256/257

8) उपरोक्त – 2 पृष्ठ क्र. 257

9) उपरोक्त – 2 पृष्ठ क्र. 190